**नियोजन (रोजगार हमी योजना) विभागाकरिता कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ सेवा मे.ब्रीस्क इंडीया प्रायव्हेट लिमीटेड, पुणे या मनुष्यबळ पुरवठादार संस्थेकडून उपलब्ध करुन घेणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: मग्रारो-२०२२/प्र.क्र.२४२/रोहयो-७**

१६ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- ०२ जानेवारी, २०२३.

वाचा :

१.शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांकः-पदनि-२०१०/प्र.क्र.८४/१०/विसू-१, दि.२७ सप्टेंबर, २०१०

२.शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांकः- पदनि-२०१३/प्र.क्र.११/१३/विसू-१, दि.०२ फेब्रुवारी, २०१३

३.शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांकः-पदनि-२०१३/प्र.क्र.११२/१३/वित्तीय सुधारणा-१, दि.०२ डिसेंबर, २०१३

४.शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांकः-पदनि-२०१६/प्र.क्र.२९/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.०२ ऑगस्ट, २०१६

५.शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांकः- संकिर्ण-२०१९/प्र.क्र.२२/कोषा-प्रशा-४, दि.१७ जुलै, २०२०

६.शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांकः-काआआ-२०१३/प्र.क्र.२३३/ कामगार-८, दि.१८ जून, २०१४

७.शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांकः-संकिर्ण-२०१९/ प्र.क्र.१३/ कामगार-८, दि.२२ फेब्रुवारी, २०१९

८.शासन परिपत्रक नियोजन विभाग (रोजगार हमी योजना-मग्रारो/२०१०/प्र.क्र.३०/ रोहयो-७ दि.०४ जून, २०१३

९. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- राज्य निधी असोसिएशनच्या राज्य नियामक मंडळाच्या (Governing Council) दिनांक २७ ऑगस्ट, २०१९ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

१०.शासन परिपत्रक नियोजन विभाग (रोजगार हमी योजना)-मग्रारो /२०१०/प्र.क्र.६१/ रोहयो-७ दि.०६ नोव्हेंबर, २०१९.

११. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- राज्य निधी असोसिएशनच्या कार्यकारी समिती (Executive Committee) दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

**परिपत्रक :-**

२. प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेऊन विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रशासकीय विभागांनी कामाचा व्याप बघून **मनुष्यबळ सेवा** बाहय यंत्रणेद्वारे करुन घेणेबाबत वित्त विभागाने संदर्भाधीन परिपत्रकान्वये वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर धोरणानुसार शासनाच्या सर्व विभागांमार्फत, विभागांतर्गतच्या कार्यालयामार्फत कंत्राटदारांकडून कंत्राटी स्वरुपात मनुष्यबळ घेण्यात येते. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने शासन निर्णय दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये मंत्रिमंडळ बैठकीतील निर्देशानुसार शासकीय विभागामध्ये कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना कंत्राटदारामार्फत करारातील तरतुदीनुसार वेतन व अन्य भत्ते, वैधानिक देण्यासह प्रदान व्हावे यासाठी वेतन अदा करण्याबाबतची समान कार्यपध्दती सर्व विभागांना लागू करण्यात आली आहे. तसेच उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या दि.२४ जुलै, २०१९ च्या अधिसूचनेनुसार किमान वेतन दर निश्चित केले आहेत.

३. नियोजन (रोजगार हमी योजना) विभागाच्या असे निदर्शनास आले आहे की, या विभागाच्या अधिनिस्त असलेली विविध कार्यालये जसे, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आयुक्तालय, नागपूर, मंत्रालय स्तर व विभागांतर्गत इतर कार्यालयांमध्ये बाह्ययंत्रणेद्वारे (Outsourcing) कर्मचारी वर्ग घेतले जात होते. असे करताना विविध कार्यालयाद्वारे फक्त L१च्या आधारे बाहययंत्रणा संस्था (Outsourcing agency) ची निवड केली जात होती व तसे करताना कामगारांना किमान वेतन, भविष्य निर्वाहनिधी, ESIC, इत्यादीचा फायदा दिला जात नव्हता व वरील महत्वाच्या कामगार कायद्यांचे सर्रास उल्लंघन व पायमल्ली केली जात होते. सदरचा विभाग हा प्रधान नियुक्त प्राधिकारी (Principal Employer) असल्यामुळे उद्भवलेल्या कायदेशीर खटल्यात या विभागाला जबाबदार धरले जाते. सदर कायद्यांचे उल्लंघन शासकीय कार्यालयाद्ववारे करणे योग्य नाही. तसेच अनावधानांने सदर संबंधीत कार्यालयाद्वारे शासनासाठी कामगार कायदा अंतर्गत अनेक वित्तीय दायित्वे (Financial Liability) उभ्या केल्या जातात व संबंधीत अधिकारी कायदेशीर कारवाई साठी पात्र ठरतात.

४. वित्त विभाग तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या आदेशानुसार नियोजन (रोजगार हमी योजना) विभाग व विभागाच्या अधिनस्त विविध कार्यालयांमध्ये बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

५. **ब्रीस्क इंडीया प्रायव्हेट लिमीटेड, पुणे** ही मनुष्यबळ पुरवठादार संस्था राज्यशासनाच्या बहूतांशी विभागात गेली पाच वर्षे सर्व आवश्यक तांत्रिक, अतांत्रिक, व्यवस्थापकीय व प्रशासकीय मनुष्यबळ सेवा पुरवीत आहे. तसेच या संस्थेला राज्य शासनाने अशा तऱ्हेच्या सेवा देशव्यापी स्तरावर पुरवठा करण्यासाठी मान्यता दिलेली आहे.

६. तेव्हा बाह्ययंत्रणेमध्ये एकसुत्रतता आणण्यासाठी व विविध कामगार कायद्यांचे पालन करण्याकरीता आणि वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनानुसार तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या धर्तीवर रोजगार हमी योजना विभागाच्या अधिनस्त विविध कार्यालये जसे जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आयुक्तालय, नागपूर, मंत्रालय स्तर व विभागांतर्गत इतर कार्यालयांमध्ये बाह्ययंत्रणेद्वारे (Outsourcing) मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यासाठी अशा मनुष्यबळाची उपलब्धता करणारी अधिकृत एजन्सी म्हणून सद्यस्थितीत, सीएससी एसपीव्ही ई गव्हर्नस सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड, नवी दिल्ली या विभागास मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या बाह्यस्थ संस्थेसोबतचा करार संपुष्टात आणण्यात येत आहे व **ब्रीस्क इंडीया प्रायव्हेट लिमीटेड, पुणे** या मनुष्यबळ पुरवठादार संस्थेला मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी खालील **अटी व शर्तीनुसार** मान्यता देण्यात येत आहे.

१) अशा उपलब्ध करुन घेतलेल्या मनुष्यबळाची पिळवणूक होऊ नये, त्यांना कामगार विभागाच्या वेळोवेळी निर्गमित आदेशानुसार किमान वेतन / मोबदला मिळावा, अनुज्ञेय सर्व वैधानिक व कल्याणकारी फायदे मिळावे, सर्व वैधानिक वजावटी; जसे भविष्य निर्वाह निधी ग्रॅज्युइटी, ESIC, व्यवसाय कर इत्यादींच्या तरतुदींचे पालन व्हावे यासाठी कामगार विभागाने निर्गमित केलेले आदेश, नियम, अटी व शर्ती यांचे काटेकोर पालन करणे ब्रीस्क इंडीया प्रायव्हेट लिमीटेड, पुणे यांना बंधनकारक राहील.

२) अशा कंत्राटी मनुष्यबळाला नियोजन (रोजगार हमी योजना) विभागात कार्य करण्यासाठी जे प्रशासकीय प्राथमिक प्रशिक्षण आवश्यक आहे ते देण्याचेही ब्रीस्क इंडीया प्रायव्हेट लिमीटेड यांनी मान्य केले आहे.

३) COVID-१९ साथीच्या पार्श्वभूमीवर मनुष्यबळाच्या करोना चाचण्या व इतर अनुषंगिक आरोग्य तपासण्या नेमणुकीचे वेळी व नंतरही वेळोवेळी करुन घेण्यात याव्यात. त्याचे दर हे Central Government Health Scheme (CGHS) पेक्षा जास्त नसावेत. त्यासाठी होणारा खर्च ब्रीस्क इंडीया प्रायव्हेट लिमीटेड, पुणे यांनी कामगारांच्या वेतनातून वजा करावा.

४) राज्याच्या कामगार / वित्त विभागाने निर्गमित केलेल्या मनुष्यबळ मोबदला दर, विहीत सेवा शुल्क दर व इतर वैधानिक वजावटी या सर्व अटी, शर्ती पालन करुन, तसेच आवश्यक प्रशिक्षण मनुष्यबळाला देऊन, त्यांची आरोग्य तपासणी करुन, तसेच या मनुष्यबळाचा कोणताही थेट **“मालक-नोकर”** संबंध शासनाशी निगडीत होणार नाही, केवळ त्यांच्या सेवा शासनास प्राप्त होणार असल्याने व मनुष्यबळ पुरवठा यंत्रणा म्हणजे **ब्रीस्क इंडीया प्रायव्हेट लिमीटेड, पुणे** हि संस्था यासाठी पूर्णतः उत्तरदायी राहील.

५) बाहय यंत्रणेद्वारे काम करुन घेणाऱ्या एजन्सीनेच शासनाने निर्धारीत केलेल्या वेतनदराप्रमाणे वेतन व वेळोवेळी लागु असलेले कर व अनुज्ञेय भत्त्यांची अदायगी करणे बंधनकारक राहील. सेवापुरवठादराकडुन उपलब्ध करुन दिलेल्या मनुष्यबळाला देय असलेले कायदेशीर दायित्व (Statutory Liabilities) उदा. भविष्यनिर्वाह निधी, ग्रॅज्युइटी ESIC, बोनस, लेबर, वेल्फेअर फंड, इत्यादीचा समावेश वेतनात अंतर्भूत असून संबंधीत प्राधिकरणाकडे कायदेशीर दायित्व जमा करण्याची जबाबदारी संबंधीत सेवा पुरवठादाराची राहील व त्याबाबतची कागदपत्रे सेवा पुरवठादार शासन व कामगार आयुक्त यांचेकडे वेळोवेळी जमा करील.

६) उपलब्ध मनुष्यबळास त्यांना नेमून दिलेल्या कामाच्या अनुषंगाने मुख्यालय सोडून इतरत्र प्रवास करण्यासाठी नियमानुसार दैनिक भत्ता/प्रवास भत्ता इत्यादी देय राहील. **अशा देण्यात येणाऱ्या भत्त्यावर सेवाशुल्क अदा करण्यात येणार नाही.** तसेच कोविड -१९ व

अन्य आपत्तीच्या काळात अत्यावश्यक क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासन नियमानुसार विमा कवच अनुज्ञेय राहील.

७) सदर बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्याचे काम **ब्रीस्क इंडीया प्रायव्हेट लिमीटेड,पुणे** या मनुष्यबळ पुरवठादार संस्थेस तसेच सदर संस्थेच्या अधिकृत अभिकरणास किंवा सहयोगी भागीदार कंपनीस करारनाम्याच्या दिनांकापासून एक वर्ष किंवा उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग नव्याने बाह्यस्थ संस्था निवड करेल तो कालावधी यापैकी आधी घडेल ते या कालावधी करता देण्यात येत आहे.

८) जर ब्रीस्क इंडीया प्रायव्हेट लिमीटेड, पुणे मार्फत संस्थेच्या अधिकृत अभिकरणास किंवा सहयोगी भागीदार कंपनीस सदर काम देण्यात येणार असेल तर त्याची माहिती नियोजन (रोजगार हमी योजना) विभागास कळविणे ब्रीस्क इंडीया प्रायव्हेट लिमीटेड, पुणे यांना बंधनकारक असेल व अशा संस्थेत ब्रीस्क इंडीया प्रायव्हेट लिमीटेड, पुणे यांच्यासोबत केलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक असेल.

९) कंपनी/संस्थेतर्फे काम करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०) बाहय यंत्रणेद्वारे काम करुन घेण्याकरीता कोणतीही पदनिर्मिती केली जाणार नाही.

११) **ब्रीस्क इंडीया प्रायव्हेट लिमीटेड, पुणे** या मनुष्यबळ पुरवठा यंत्रणेला अशा मनुष्यबळ पुरवठा कामी कामगार विभागाने निश्चित केल्याप्रमाणे १४% सेवाशुल्क देण्यात येईल. हे सेवा शुल्क एकुण मनुष्यबळ पुरवठा खर्चावर आकारुन देण्यात यावे. तसेच शासन नियमानुसार वस्तू व सेवा कर (Goods and Service Tax) देय असल्यास तो संपूर्ण पणे वेगळा अदा केला जाईल.

१२) प्रस्तुत सेवा पुरवठादारबरोबर वित्त विभागाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार आवश्यक अटी/शर्तीचा अर्तंभाव करुन करारनामा हा केंद्रीय पातळीवर केला जाईल. त्यामुळे विभागांतर्गत यंत्रणांना वेगळा करारनामा करण्याची आवश्यकता नाही.

१३) बाहयस्थ यंत्रणेमार्फत कामे करुन घेण्यासंदर्भात किमान वेतन अधिनियम अंतर्गत कामगार विभागातर्फे विषद केल्यानुसार त्या-त्या संवर्गातील निर्धारित केलेल्या किमान

वेतनदराप्रमाणे वेतनास (सेवाशुल्कासह) मान्यता देण्यात येत आहे. तथापि सदरचे वेतन हे नियोजन (रोहयो) विभागामार्फत निश्चित करण्यात येईल.

१४) **ब्रीस्क इंडीया प्रायव्हेट लिमीटेड, पुणे** यांनी शासनाकडे रु. ५० लाख रुपयाची अधिकोष हमी (बँक गॅरंटी) जमा करावी. करार कालावधीत प्रस्तुत बाबींत शासनाच्या धोरणामुळे काही बदल झाल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

१५) सेवापुरवठादाराकडून पुरविण्यात येणाऱ्या मनुष्यबळाचे प्रारंभिक वेतन, वेतन टप्प्यावरील प्रारंभिक वेतनानुसार राहील. मात्र अनुभवी व शैक्षणीक अर्हतेच्या आधारे प्रारंभिक वेतनाच्या पुढील टप्प्यांवर वेतननिश्चिती करण्याची मुभा कार्यालय प्रमुखांना राहील. तथापि, हया बाबतची मंजूरी ही शासन स्तरावरुन घेण्यात यावी. सद्यस्थितीत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- राज्य निधी असोसिएशनच्या राज्य नियामक मंडळाच्या (Governing Council) दिनांक २७ ऑगस्ट, २०१९ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताचे व शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१६) शासन धोरणानुसार व कामगार विभागाच्या आदेशानुसार असे मनुष्यबळ मागणी केल्यापासून ३० दिवसांत संबंधित मागणी केलेल्या यंत्रणेला पुरविणे बंधनकारक राहील. तसेच, एखाद्या व्यक्तीचे काम समाधानकारक नसल्यास त्याबाबत ३० दिवस अगोदर त्याला कामावरून कमी करण्याबाबत संस्थेस कळविण्यात येईल, संस्थेने त्याच अर्हतेचा दुसरा कर्मचारी ३० दिवसाच्या आत पुरविणे बंधनकारक राहिल.

१७) बाहय यंत्रणेद्वारे कामे करुन घेताना, जर ती कामे नियमितपणे पदनिर्मिती करुन केली असता जितका खर्च आला असता त्या खर्चाच्या कमीत कमी १० ते २५ % इतकी बचत होईल अशा रितीने करुन घेण्यात यावीत.

१८) सदर बाबींकरीताचा खर्च हा या पूर्वी ज्या लेखाशिर्षाखाली करण्यात येत होता त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

७. **ब्रीस्क इंडीया प्रायव्हेट लिमीटेड, पुणे** या संस्थेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या मनुष्यबळाला मानधन प्रदान करण्याकरीता खालील कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

१. नियोजन (रोजगार हमी योजना प्रभाग) विभाग व विभागाच्या अधिनस्त आयुक्तालय नागपूर, सर्व उपआयुक्त (रोहयो), सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी त्यांना पुरविण्यात आलेल्या कंत्राटी मनुष्यबळाचा उपस्थिती अहवाल दर महिन्याच्या ०१ तारखेपर्यंत शासनास सादर करावा.

२. शासन स्तरावरुन सदरचा उपस्थिती अहवाल जिल्हानिहाय ब्रीस्क इंडीया प्रायव्हेट लिमीटेड, पुणे यांना दरमहा ०३ तारखेस सादर करण्यात येईल.

३. ब्रीस्क इंडीया प्रायव्हेट लिमीटेड, पुणे यांनी याबाबतचे जिल्हा /कार्यालय निहाय देयक दरमहा ०५ तारखेपूर्वी शासनास सादर करावे. सदर देयकाचे प्रदान आयुक्त, नरेगा, नागपूर यांच्यामार्फत दरमहा ०७ तारखेस सेवापुरवठादार संस्थेस अदा करण्यात येईल.

४. सेवापुरवठादार संस्थेने सर्व कंत्राटी मनुष्यबळास मानधनाचे प्रदान दरमहा १० तारखेपर्यंत करणे बंधनकारक राहील.

८. त्यानंतर मनुष्यबळ ब्रीस्क इंडीया प्रायव्हेट लिमीटेड, पुणे कडून उपलब्ध करून घेण्याबाबत शासन स्तरावरून मान्यतेने विनाविलंब कार्यवाही करण्यात यावी.

९. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कार्य करणाऱ्या विविध यंत्रणांना अधिकच्या मनुष्यबळाची आवश्यकता असल्यास अशा मनुष्यबळाची मागणी यंत्रणांनी शासनाकडे करावी. यंत्रणांनी कोणत्याही परिस्थितीत परस्पर ब्रीस्क इंडीया प्रायव्हेट लिमीटेड, पुणे यांचेकडे मनुष्यबळ मागणीचा पत्रव्यवहार करण्यात येऊ नये.

१०.सदर बाह्यस्थ संस्थेकडून उपलब्ध करून घेण्यात येणाऱ्या मनुष्यबळाकरिता लागणारा खर्च केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या ६% प्रशासकीय खर्चातून करण्यात येईल.

११.ब्रीस्क इंडीया प्रायव्हेट लिमीटेड, पुणे यांना हेही कळवण्यात येते की यापूर्वीच्या बाह्यस्थ संस्थेकडे कार्यरत असलेल्या कंत्राटी मनुष्यबळाचे प्रलंबित मानधन तसेच अन्य प्रलंबित अदायगी आपल्या संस्थेमार्फत करण्यात येईल.

१२.या व्यतिरिक्त सेवापुरवठादारास राज्य शासनाने निर्गमीत केलेले शासन निर्णय

(१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. पदनि-२०१०/८४/१०/विसु-१ए. दि. २७.९.२०१०

(२) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. पदन-२०१३/प्र.क्र.११/१३/विसु-१, दि. २.२.२०१३

(३) शासन परिपत्रक क्र. पदन- २०१३/प्र.क्र.११२/१३/वित्तीय सुधारणा-१, दि. २.१२.२०१३

(४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. काआआ-२०१३/प्र.क्र.२३३/कामगार-८, दि. १८.६.२०१४ मध्ये नमूद करणात आलेल्या अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

त्याचप्रमाणे रोजगार हमी योजना विभागाच्या आवश्यकतेनुसार व कामाची निकड लक्षात घेऊन आवश्यक त्या अटी व शर्ती अंतर्भूत करु शकेल व त्या सेवापुरवठादारावर बंधनकारक राहतील.

१३. यासप्रकरणी अटी व शर्तीचा अर्थ लावण्याच्या अनुषंगाने अथवा कोणताही वाद उद्भवल्यास सदर प्रकरणी शासन निर्णय घेईल व शासनाचा निर्णय अंतिम समजण्यात येईल.

तसेच, कोणत्याही पक्षकाराची या करारनाम्यातून बाहेर पडण्याची इच्छा असल्यास ३० दिवसांची दुसऱ्या पक्षकारास नोटीस देऊन करारातून बाहेर पडता येईल,

हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२३०१०२१४४५३५७८१६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by NANDKUMAR VERMA
Date: 2023.01.10 12:12:48 +05'30'

**( नंद कुमार )**
**अपर मुख्य सचिव, (रोहयो)**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव.
२. मा. अपर मुख्य सचिव (रोहयो), यांचे स्वीय सहायक .
३. सर्व विभागीय आयुक्त
४. आयुक्त, कृषी आयुक्तालय, पुणे.
५. आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर
६. सर्व जिल्हाधिकारी,
७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
८. सर्व उपायुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालये,
९. संचालक (फलोत्पादन), कृषी आयुक्तालय, पुणे,
१०.संचालक (मृद संधारण), कृषी आयुक्तालय, पुणे,

११.मुख्य अभियंता (मृद व जलसंधारण) सर्व,

१२. सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,

१३.सर्व जिल्हा रेशीम अधिकारी,

१४.सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो) ,

१५.सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा, ग्रामपंचायत),

१६.सर्व गटविकास अधिकारी, नरेगा,

१७.उपवनसंरक्षक (सर्व),

१८. उपसंचालक, सामाजिक वनीकरण (सर्व),

१९. वित्त विभाग (अर्थ-१६ , व्यय-८,)

२०.नियोजन विभाग (का.१४३४ व का.१४२४),

२१.निवड नस्ती, रोहयो - ७.